शिक्षण सहसंचालक , महाराष्ट्र शिक्षण सेवा, गट-अ (प्रशासन शाखा) संवर्गातील अधिकाऱ्यांची दिनांक १.१.२०१७ ते दिनांक ३१.१२.२०१७ अखेरची म्हणजेच दिनांक ०१.०१.२०१८ रोजीची तात्पुरती ष्ठतासूची

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन परिपत्रक क्रमांकः ज्येष्ठता-२११८/प्र.क्र.४५/प्रशा-२
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२
दिनांक: २० एप्रिल, २०१८

वाचा : आयुक्त (शिक्षण) यांचे कार्यालयाचे पत्र क्र. आस्था-ब/१२४/ज्येसू/शिसं/२०१८/१८९ दिनांक १०.०१.२०१८

शासन परिपत्रक

महाराष्ट्र शिक्षण सेवा, गट-अ (प्रशासन शाखा) संवर्गातील शिक्षण सहसंचालक पदाची दिनांक ०१.०१.२०१७ अखेरची अंतिम ज्येष्ठता सूची दिनांक ०२.०५.२०१७ रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे. आता दिनांक ०१.०१.२०१८ पर्यंतची तात्पुरती ज्येष्ठतासूची सोबतच्या प्रपत्रात प्रसिध्द करण्यात येत आहे.

२. सदर ज्येष्ठतासूची शासन निर्णय क्रमांक एसआरव्ही/२०११/प्र.क्र.२८४/१२, दिनांक २१.१०.२०११ नुसार तयार करण्यात आली आहे. तसेच सदर ज्येष्ठतासूची निर्गमित करण्यापूर्वी सामान्य प्रशासन विभागाचे अभिप्राय घेण्यात आले आहेत.

३. मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी याचिका क्र.२७९७/२०१५ मध्ये दिनांक ०४.०८.२०१७ रोजी दिलेल्या निर्णयान्वये, दिनांक २५.०५.२००४ चा शासन निर्णय रद्द करुन पदोन्नतीमधील आरक्षण अवैध ठरविले आहे. सदर निर्णयास आव्हानित करण्यासाठी मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ दाखल करण्यात आली आहे. सदर विशेष अनुज्ञा याचिकेमधील अंतिम निर्णयाच्या अधिन राहून ही ज्येष्ठतासूची निर्गमित करण्यात येत आहे. त्यानुसार सन २००४ नंतरच्या निवडयाद्यांमध्ये बदल झाल्यास त्यानुसार सदर ज्येष्ठतासूचीमध्ये बदल होईल, या अटीच्या अधीन राहून ही ज्येष्ठतासूची प्रसिध्द करण्यात येत आहे.

४. आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी सदरहू ज्येष्ठतासूची सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणावी, ज्या अधिकाऱ्यांना ज्येष्ठतायादी संबंधित आक्षेप असतील त्यांनी त्या संदर्भातील निवेदन आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्यामार्फत, हे आदेश निर्गमित

झाल्यापासून दोन आठवडयाच्या आत शासनास सादर करावे. विहित कालमर्यादेनंतर आलेल्या निवेदनाचा विचार करण्यात येणार नाही. आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य पुणे यांनी विहित कालमर्यादेत प्राप्त झालेली निवेदने त्यांच्या अभिप्रायासह शासनाकडे तात्काळ पाठवावीत.

५. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०१८०५०८११५११०८७४२१ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Ravindra Pralhad Ate

Digitally signed by Ravindra Pralhad Ate
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sport Departrment, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=fd5fc4fce5f6732e6657dca817ae6ee619a55d170d3c93eff53c3ca69d1a772d, serialNumber=eaa37af2edb5809b000f33d26328f6cdac80ee32afdac3f68b5821d14e41dffa, cn=Ravindra Pralhad Ate
Date: 2018.05.08 11:54:37 +05'30'

सोबत : प्रपत्र

(र. प्र. आटे)

सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. आयुक्त शिक्षण, आयुक्त शिक्षण यांचे कार्यालय, महाराष्ट्र राज्य पुणे,
२. सर्व संबंधित अधिकारी आयुक्तालयामार्फत
३. निवड नस्ती.

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन परिपत्रक क्र. ज्येष्ठता-२११८/प्र.क्र.४५/प्रशा-२, दि २०.०४.२०१८ सोबतचे सहपत्र

प्रपत्र

शिक्षण सहसंचालक व तत्सम पदावरील अधिका-यांची दिनांक १/१/२०१७ ते ३१/१२/२०१७ अखेरची म्हणजेच ०१.०१.२०१८ ची तात्पुरती ज्येष्ठता सूची

अ.क्र	ज्येष्ठता क्रमांक	अधिकाऱ्याचे नाव	प्रवर्ग (नियुक्तीनंतर प्रवर्ग बदलला असल्यास त्याचा दिनांक	जन्म दिनांक	नियुक्तीचा दिनांक	नियुक्तीचा मार्ग (सरळसेवेने/ मर्यादित विभागीय परीक्षेव्दारे नियुक्त उमेदवारांचा क्रमांक व परीक्षेचे वर्ष.)	ज्येष्ठता दिनांक/ ज्येष्ठतेचा मानीव दिनांक	सेवानिवृत्तीचा दिनांक	अभिप्राय
१	२	३	४	५	६	७	८	९	१०
१	१	श्रीम. श.मो. काळे	खुला	५.१२.१९६२	२०.७.२०१२	पदोन्नती	२०.७.२०१२	३१.१२.२०२०	शा.नि.दि.२१.०९.२०१७ अन्वये शिक्षण संचालक पदावर पदोन्नत
२	२	श्री. द. गो. जगताप	इ.मा.व.	४.४.१९६४	२१.७.२०१२	पदोन्नती	२१.७.२०१२	३०.४.२०२२	शा.नि.दि.२१.०९.२०१७ अन्वये शिक्षण संचालक पदावर पदोन्नत
३	३	श्री सं.मा.गणोरकर	इ.मा.व.	१४.८.१९५९	७.११.२०१२	पदोन्नती	७.११.२०१२	३१.८.२०१७	सेवानिवृत्त
४	४	श्री. सु.रा.चव्हाण	वि.जा.(अ)	४.२.१९६३	१.८.२०१२	पदोन्नती	१.८.२०१२	२८.२.२०२१	शा.नि.दि.२१.०९.२०१७ अन्वये शिक्षण संचालक पदावर पदोन्नत

५	५	श्री. व. बा. पायमल	खुला	१.६.१९५९	१७.०१.२०१४	पदोन्नती	१७.०१.२०१४	३१.५.२०१७	सेवानिवृत्त
६	६	श्री. शि. क. घोनमोडे	अ.जा.	२८.६.१९५९	१७.०१.२०१४	पदोन्नती	१७.०१.२०१४	३०.६.२०१७	सेवानिवृत्त
७	७	श्री. सु. ह.डेरे	खुला	२.८.१९६०	१७.०१.२०१४	पदोन्नती	१७.०१.२०१४	३१.८.२०१८	
८	८	श्री.महेश करजगावकर	खुला	२८.७.१९६१	१५.०७.२०१४	पदोन्नती	१५.०७.२०१४	३१.७.२०१९	
९	९	श्री. तु.ना. सुपे	अ.ज.	०१.०६.१९६४	१०.०७.२०१७	पदोन्नती	१७.०७.२०१७	३१.०५.२०२२	
१०	१०	श्री.रा.वि.गोधने	इ.माव	१०.०८.१९६१	१७.०७.२०१७	पदोन्नती	१०.०७.२०१७	३१.०८.२०१७	

Ravindra Pralhad Ate

Digitally signed by Ravindra Pralhad Ate
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sport Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=fd5fc4fce5f6732e6657dca817ae6ee619a55d170d3c93eff53c3ca69d1a772d, serialNumber=eaa37af2edb5809b000f33d26328f6cdac80ee32afdac3f68b5821d14e41dffa, cn=Ravindra Pralhad Ate
Date: 2018.05.08 11:54:55 +05'30'

(र. प्र. आटे)

सह सचिव, महाराष्ट्र शासन